# पर्यावरण व सामाजिक जागृकतेचा विश्लेषनात्मक अभ्यास

प्रा. डॉ. मंजुषा दिंगबर समर्थ
सहायक प्राध्यापिका
आर्ट्स कॉलेज,
सिहोरा, जिल्हा भंडारा

---

*प्रस्तावना :*

*पर्यावरण या शब्दात जे घटक किंवा वायूमंडळ जलमंडळ आणि स्थलमंडळात अस्तित्वात येऊन जीवनाच्या विकासाकरिता सतत सहायक ठरतात अशा सर्व सजीव निर्जीव घटकांचा समावेश होतो. जीवनाच्या प्रारंभी वरील घटकातील संतुलनामुळेच पृथ्वीतलावर सजीव सृष्टीची निर्मिती झालेली आहे. पृथ्वीशिवाय अन्य ग्रहावर सर्व घटकांचे संतुलन झाले नसल्यामुळे तेथे सजीव सृष्टी निर्माण होऊ शकली नाही.*

*पर्यावरण या संकल्पनेत सामान्यतः सजीव व निर्जीव घटक हवा, पाणी, जमीन, वृक्षवल्ली आणि मानव यातील परस्परसंबंध यांचा समावेश होतो. सृष्टी ही सतत परिवर्तनशिल असते. सृष्टीतील प्रत्येक परिवर्तनाचा सजीवांवर प्रत्यक्षपणे प्रभाव पडत असतो. सृष्टीतील परिवर्तन हे नैसर्गिक तत्वानूसार होत असल्यास अस्तित्वात असलेले सजीव त्या परितर्वनानूसार स्वतःस त्या परिस्थितीनुरूप बदलवितात. परंतु ही परिवर्तने जर मानवनिर्मित कारणांमुळे घडून येत असतील तर अशा अनैसर्गिक परिवर्तनामुळे सजीव या परिवर्तनानुरूप बदल घडवून आणण्यास असमर्थ ठरतात. या परिवर्तनामुळे संपूर्ण संतुलन ढासळून मानवी जीवन दुःखात लोटले जाते. पर्यावरणाचे संतुलन औद्योगिकरणाची प्रक्रिया तीव्र केल्यामुळे तसेच अनेक शस्त्रांच्या स्पर्धेमुळे ढासळत चालले आहे. औद्योगिकरणामुळे अण्वस्त्रांच्या सततच्या प्रात्यक्षिकांमुळे पर्यावरण संतुलन विस्कळीत झालेले आहे.*

*पर्यावरण शिक्षणाचा संबंध त्या प्रत्येक प्रश्नाची आहे जे एका जीवित शरिराला प्रभावित करतात. मुळात हा एक बहुशास्त्रीय दृष्टीकोन आहे. जे आमच्या नैसर्गिक जीवन आणि मानवावरील त्यांच्या प्रभावाला समग्रतेमध्ये समजण्यास शिकविते. हे एक व्यावहारिक शास्त्र आहे. कारण याचा उद्देश हा अधिकाधिक महत्वपूर्ण होत असलेल्या या प्रश्नाला उत्तर देण्याचा आहे की, पृथ्वीवरील मर्यादित संसाधनाचे बलावर मानव सभ्यतेला कशाप्रकारे कायम ठेवता येईल.*

*जीवविज्ञान, भूगर्भ विज्ञान, रसायनशास्त्र, भौतिकी, अभियांत्रीकी, समाजशास्त्र, आरोग्य, मानवशास्त्र, अर्थशास्त्र, सांख्यिकी, संगणक आणि दर्शनशास्त्र हे पर्यावरण अध्ययनाचे विभिन्न घटक आहेत. सृष्टीला चारही बाजूने घेरलेल्या आवरणाला पर्यावरण म्हटले जाते. पर्यावरणाचे स्वरूप सजीवांना सर्व बाजुंनी घेरून टाकणारी परिस्थिती असून ती मानवाच्या प्रत्येक अंगावर प्रभाव टाकते. याशिवाय पर्यावरण मानवाचे सांस्कृतिक व सामाजिक जीवनसुद्धा प्रभावीत करते. प्रा.डी.एच. डेव्हिसच्या मते "पर्यावरणाचे स्वरूप हे मानव किंवा भूमी यांच्या सभोवताल असणाऱ्या भौतिक सृष्टीशी संबंधित असून त्याचा मानव जीवनावरील परिणाम स्पष्टपणे दिसून येतो"*

*संशोधनाचा उद्देश :*

1. *पर्यावरण म्हणजे काय याचा अभ्यास करणे.*
2. *पर्यावरणाच्या रक्षणासाठी उपाययोजना सुचविणे.*
3. *पर्यावरणसंबंधी लोकांमध्ये जागृकता निर्माण करणे.*

*4. पर्यावरणाचे ध्येय समोर ठेवून संसाधनाच्या संरक्षणाच्या प्रचार करणे.*

*शोध निबंधासाठी उपयोगात येणारी संशोधन पध्दती :*

*शोध निबंधातील अभ्यास व द्वतीय समंकावर अवलंबून आहे. समंकाचे संकलन हे विषयाशी संबंधित विविध पुस्तके, मासिके, वार्षिक अहवाल, वर्तमानपत्र व सांकेतिक स्थळावरून करण्यात आले आहे.*

*पर्यावरणाच्या अभ्यास व महत्व :*

*आपण ज्या क्षेत्रात राहतो त्यांच्या नैसर्गिक इतिहासाचे अध्ययन केल्यास असे दिसून येते की आमचे वर्तमान वातावरण हे भूतकाळात नैसर्गिक भूदृश्य होते. जसे जंगल पर्वत, वाळवंट किंवा या सर्वांचा संयोग होय. यातील अधिकतर लोक अशा भूप्रदेशात राहतात जे मनुष्याकडून फारच अधिक परिवर्तीत होऊन गाव, खेडे आणि शहरात बदल झाले. परंतु जे लोक शहरवासी आहेत त्यांना सुध्दा खाद्य पदार्थ जवळपासच्या गावातून मिळतात आणि ही गावे सुध्दा शेतीसाठी पाणी, जलाऊ लाकडे, चारा आणि मछली सारख्या संसाधनसाठी जंगले, चाऱ्यांचे मैदान, नद्या समुद्रतट यासारख्या नैसर्गिक भूप्रदेशावर अवलंबून आहेत अशाप्रकारे दररोजच्या जीवनाचा अटुट संबंध आहे आणि यामुळे आमचे वातावरणही प्रभावीत होते.*

*पिण्यासाठी पाणी आणि दररोज इतर कामासाठी पाण्याचा उपयोग करतो, हवेमध्ये श्वास घेतो. अशा साधनांचा उपयोग करतो, ज्यात आमचे भोजन बनते, जीवंत झाडे–झुडपे आणि जीवांच्या समुदायावर अवलंबून असतो ज्यामुळे जीवनाचे जाळे बनते. ज्याचा एक भाग आम्ही सुध्दा आहोत. आजूबाजुची प्रत्येक वस्तु पर्यावरण आहे आणि आमचे जीवन त्यांना यथासंभव सुरक्षित ठेवण्यावर अवलंबून आहे.*

*निसर्गावर आमची निर्भरता एवढी अधिक आहे की, पृथ्वीवरील पर्यावरणीय संसाधनाचे रक्षण केल्याशिवाय आम्ही जीवंत राहू शकत नाही. म्हणून अधिकतर संस्कृती पर्यावरणाला 'निसर्ग माँ' म्हणतात. तसेच अधिकतर परंपरागत समाज जाणतात की निसर्गाचे सम्मान करणे त्यांच्या जीवीकेच्या रक्षणासाठी किती आवश्यक आहे. यामुळे अशा कितीतरी सांस्कृतिक कार्यकलाप विकसीत झालेत ज्यांनी परंपरागत समाजाला त्यांच्या नैसर्गिक साधनांच्या सरंक्षणात मदत केलेली आहे. भारतात निसर्ग आणि सर्व जीवंत प्राण्याकडे लक्ष देणे ही काही नवीन बाब नाही आणि सर्व परंपरा याच जीवन मूल्यावर आधारित आहेत.*

*मागील शंभर वर्षात आधुनिक समाज असे मानू लागला की, औद्योगिक नवप्रवर्तनांचा बेलगाम उपयोग करून अधिकाधिक साधने जमा करण्याच्या प्रश्नांचे सरळ समाधान काढले जाऊ शकते. उदा. कृत्रीम खते आणि कीटकनाशके औषधांचा उपयोग करून अन्न उत्पादन वाढविणे, पाळीव प्राणी आणि चांगल्या प्रकारच्या फसलांच्या बिजांचा विकास करणे, मोठ्याा धरणाच्या पाण्याने शेतीला पाणी देणे आणि उद्योगांचा विकास करणे इत्यादी या सर्वांचा परिणाम म्हणजे आर्थिक वृध्दी होय. परंतु अशाप्रकारच्या अविचारित विकासाने स्वाभाविक रूपाने पर्यावरणाला नुकसानच झाले.*

*उपभोगमुखी समाजासाठी वस्तुंचा पुरवठा करणारे औद्योगिक विकास आणि गहन कृषी मोठ्याा प्रमाणात पाणी, खनिज, पेट्रोलीयम उत्पादन आणि लाकडे इ. नैसर्गिक साधनांचा उपयोग करीत आहेत. खनिज आणि तेलासारखे अनवीकरणीय साधने अशी आहेत की भावी पीढी लक्षात न घेता यांचा वापर केल्यास ते भविष्यात समाप्त होतील इमारती लाकूड आणि पाणी यासारखी नवीकरणीय साधने ते आहेत ज्यांचा उपयोग केला जातो. परंतु त्यांना पुनर्वृद्धी किंवा पाऊससारखी नैसर्गिक प्रक्रिया पून्हा निर्मित करू*

*शकते. परंतु निसर्ग ज्यागतीने त्यांना निर्मित करतो त्यापेक्षा कितीतरी पटीने जास्त वेगाने त्यांचा उपयोग होत आहे. त्यामुळे ते सुद्धा संपुन जातील.*

*आपले पर्यावरणीय वातावरण आणि समस्यांना समजने आणि त्यांच्याप्रती जागरूकता वाढविणेच पर्याय किंवा समाधान नाही. यासाठी प्रत्येकालाच पर्यावरणाप्रती अधिक जागृत व्हावे लागेल आणि साधनांच्या उपयोगाची पध्दती बदलावी लागेल. अधिकतर लोक व्यवहाराच्या अपव्ययाच्या पद्धतीला न जाणताच त्यांचा वापर करतात की, पर्यावरणावर त्याचा काय परिणाम होईल म्हणून सर्व कार्यकलाप पर्यावरणासाठी सकारात्मक होतील यासाठी संसाधनाच्या वापराच्या पद्धतीवर एका नव्या दृष्टीने बघावे लागेल आणि तशी कृतीही करावी लागेल. जेव्हा आम्ही असे करू तेव्हा आम्ही अशा जीवनशैलीचा स्वीकार करू की जी अधिक निर्वहनीय होईल आणि ती आमच्या पर्यावरणालासुद्धा मदत करू शकेल.*

***महत्त्व :***

*आम्ही अशा जगात राहतो ज्यात नैसर्गिक साधने मर्यादित आहेत. पाणी, हवा, खनिज, तेल, जंगल, चाऱ्याचे मैदान, समुद्र कृषी आणि वापाऱ्यांकडून मजुरांकडून मिळणाऱ्या वस्तु हे सर्व आमच्या जीवनरक्षक व्यवस्थांचे भाग आहेत जसजशी लोकसंख्या वाढेल आणि प्रत्येक व्यक्तिकडून या साधनांचा उपयोग सुध्दा वाढेल तेव्हा पृथ्वीवरील संसाधनांचा भांडार निश्चितच कमी होईल. अपेक्षा करता येऊ शकत नाही की पृथ्वी ही संसाधनांच्या उपयोगाच्या या वाढत्या स्तराचा भार उचलू शकेल याव्यतिरिक्त साधनांचा दुरूपयोगसुध्दा होत आहे यासोबतच उपशिष्ट आणि पदूषणाचे वाढते प्रमाण सर्वांच्याच जीवनाच्या गुणवत्तेसाठी धोका बनलेले आहे. यास्थितीत सुधार तेव्हाच होईल जेव्हा प्रत्येक व्यक्ती दररोजच्या जीवनात असे कार्य करेल ज्यामुळे पर्यावरणाच्या संसाधनाच्या संरक्षणात सहायक ठरेल.*

***पर्यावरणासंबंधी लोकांमध्ये जागरूकता निर्माण करण्याचे उपाय :***

*पृथ्वीवरील नैसर्गिक साधनांमध्ये फार तिव्र गतीने घट होत आहे आणि मानवाच्या क्रियाकलापांमुळे पर्यावरणाचा जास्तीत जास्त ऱ्हास होत आहे. यासाठी पर्यावरणाचे होणारे नुकसान वाचविण्यासाठी काहीतरी उपाय करावेच लागतील सहसा मनुष्य विचार करतो की, हे सर्व असे काम आहे जे सरकारने करायला पाहिजेत परंतु जर आम्ही पर्यावरणासाठी धोका निर्माण करीत राहिलो तर कोणतेही सरकार हे सर्व कार्य करूच शकणार नाही. पर्यावरणाच्या ऱ्हासाला प्रतिबंध ठरते. अगदी त्याचप्रमाणे पर्यावरणाला हानी पोहोचल्यानंतर त्याची भरपाई करण्याच्या तुलनेत पर्यावरणाचे संरक्षण हे आर्थिक दृष्टीने अधिक व्यावहारिक आहे. पर्यावरणाचे प्रबंधात व्यक्तिगत रूपाने फार महत्वाची भूमिका पार पाडू शकते. नैसर्गिक संसाधनाचे होणारे नुकसान टाळू शकतो. आणि अशा चौकीदाराचे काम करू शकतो की जे पर्यावरणाचे प्रदूषण आणि ऱ्हासाच्या साधनांची माहिती सरकारला देऊ शकतील.*

*हे केवळ लोकांच्या जनजागृतीमधूनच संभव आहे. वर्तमानपत्र, रेडीयो आणि दूरदर्शन सारखे जनसंचार माध्यमे जनमतावर फारच प्रभाव टाकतात. परंतु यासाठी कोणाला तरी पुढे व्हावे लागेल. जर आमच्यामधून प्रत्येक व्यक्ती पर्यावरणाचे बाबतीत संवेदनशिल असल्यास प्रेस आणि संचार माध्यमे त्या प्रयत्नांना पुन्हा धारदार बनवू शकतात. लोकतंत्रात राजकारणी लोक जनतेच्या जबरदस्त समर्थन असलेल्या आंदोलनावर नेहमीच सकारात्मक प्रतिक्रिया दाखवितात. म्हणून संरक्षणाचे समर्थक हे कोणत्याही गैरसरकारी संघटनेला मदत करीत असल्यास राजकारण्यांना चांगल्या नितींच्या धोरणांच्या निर्मितीसाठी प्रभावित करू शकतात. आम्ही 'पृथ्वी नामक अंतरिक्ष यानात' राहतो. ज्यांच्याजवळ संसाधनाची आपूर्ती मर्यादित आहे. आमच्यातील प्रत्येकांवर जास्तीत जास्त लोकांपर्यंत हा संदेश पोहोचविण्याची जबाबदारी आहे. देशात अनेक सरकारी आणि गैरसरकारी संघटना आहेत. ज्या*

*पर्यावरणाच्या रक्षणासाठी कार्य करीत आहेत. जे पर्यावरणाची सुरक्षा निसर्ग व नैसर्गिक संसाधनाचे संसाधनात रूची घेत आहेत.*

***यासोबतच खालील उपायसुद्धा करावेत –***

१. *निसर्गाच्या अध्ययनासाठी डब्ल्यु.डब्ल्यु.एफ.आय., बी.एन.एच.एस. किंवा इतर कोणत्याही पर्यावरण संरक्षण समुहात सहभागी व्हावे.*

२. *डाऊन टु अर्थ, डब्ल्यु.डब्ल्यु.एफ.आय. न्यूजलेटर, बी.एन.एच.एस., हार्नबिल, सैक्चुअरी इ. पत्र–पत्रिकातील लेखांना वाचने सुरू करावे हे आजच्या पर्यावरणासंबंधी प्रश्नावर अधिक माहिती देतील.*

३. *मित्र आणि संबंधीयासोबत चर्चेमध्ये पर्यावरणाचे ध्येय समोर ठेवून संसाधनाच्या संरक्षणाचा प्रचार करावा. कागज, पाणी, बचत, प्लास्टीकचा वापर कमी करणे, 'कमी पुनरूपयोग, पुनर्चालन' सिद्वांतावर अंमल करणे आणि कचऱ्याचा योग्य निपटारा करणे इ. मुद्यांवर काम करून त्याचा प्रचार करावा.*

४. *आपल्या क्षेत्रात झाडांना वाचविण्यासारख्या कार्यांना समर्थन देणाऱ्या स्थानिक चळवळीत सहभाग घ्यावा. निसर्गाचा आनंद घ्यावा व्यर्थ पदार्थाचे पुनचार्लान करावे. पर्यावरण – स्नेही वस्तुंची खरेदी करावी.*

५. *चांगले नागरिक भावना आणि स्वच्छतेचा व्यवहार प्रचार करावा जसे– इकडे–तिकडे न थूंकणे, तंबाखू न चावणे सडकांवर कचरा न फेकणे, सार्वजनिक ठिकाणी धुम्रपान आणि मलमूत्र विसर्जन न करणे इत्यादी.*

६. *जागतिक पर्यावरण विषयावर, वन्यजीवन सप्ताह इत्यादी आयोजित कार्यक्रमात सहभागी होणे.*

७. *राष्ट्रीय पार्क किंवा अभयारण्यात फिरावयास जावे किंवा आपल्या घराजवळ जेही नैसर्गिक ठिकाण असेल त्यात काही वेळ घालवावा इत्यादी.*

*संदर्भ ग्रंथ*


- *पर्यावरण – डॉ घोरपडे*
- *भूगोल व पर्यावरण – ए.बी. सवदी*
- *पर्यावरण – डी.आर. खुल्ला, राव*
- *पर्यावरण विज्ञान – के.एल. तिवारी, ए.के. जाधव*
- *पर्यावरण शिक्षा – हरिचंद्र व्यास*
- *पर्यावरण अध्ययन – इरका भरूचा*

*इंटरनेटच्या माध्यमातील प्रकाशित माहिती*

- *वर्तमानपत्रातील लेख*
- *पर्यावरण परिस्थिती – माजिद हुसेन*
- *पर्यावरण प्रदूषण – गोपीनाथ श्रीवास्तव*